/

# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विकवि १२११/ प्र. क्र.२९१ / वि.प्र. ४ मुंबई-३२ दि. १८. ११. २०११

२. क्र. राज्यकर आयुक्त / आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / उपायुक्त -अपिले / धा. क्र. ११० मुंबई दि. २७/१२/२०२१

३. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विकवि-१२१९/प्र.क्र.०२/वि.प्र. ४/,दि. २५/०२/२०२०.

## कार्यालयीन आदेश

क्र. राज्यकर आयुक्त / आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / उपायुक्त -अपिले / धा. क्र. ११० मुंबई दि. 08 NOV 2023

**विषय : विक्रीकर उपायुक्त (अपिले) यांच्या अपील कार्यभाराबद्दल.**

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयाद्वारे विक्रीकर विभागाच्या पुनर्रचना आढाव्यास मंजुरी मिळाली होती. तदनंतर विक्रीकर उपायुक्तांच्या अपिल कार्यभाराबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्या सर्व आदेशांचे एकत्रीकरण करून विक्रीकर उपायुक्त यांच्या अपील कार्यभाराबाबतचे आदेश संदर्भ क्र. २. अन्वये निर्गमित करण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या वापर करून अपिलाचा जलद निपटारा व प्रशासकीय सोयीसाठी संदर्भीय आदेश क्र.२ मध्ये अंशतः बदल करण्यात येऊन पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

तक्ता क्र.१ ) ज्या विक्रीकर उपायुक्त यांच्याकडे अपिलाचे काम देण्यात आले आहे ते विक्रीकर उपायुक्त

| दि. २७/१२/२०२१ च्या आदेशातील अ.क्र | पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र | सुधारित कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ४ | विक्रीकर उपायुक्त (अपिले) ४, मुंबई | CST-APP-E-004 | मुंबईतील प्रशासकीय विभाग मुंबई ११, अन्वेषण शाखा (ब), व्यवसायकर व इतर कायदे शाखा आणि जुने अपिले सध्याप्रमाणे (मुंबई विक्रीकर कायदा व इतर कायद्याखालील अपिले पूर्वी प्रमाणे) | मुंबईतील प्रशासकीय विभाग मुंबई-११,अन्वेषण शाखा (ब) इतर कायदे शाखा आणि जुनी अपिले सध्याप्रमाणे (मुंबई विक्रीकर कायदा व इतर कायद्याखालील अपिले पूर्वीप्रमाणे ) |

**तक्ता क्र.२ ) ज्या विक्रीकर उपायुक्त यांच्याकडे अपील कामासोबत इतर प्रशासकीय जबाबदारी देण्यात आलेली आहेत ते विक्रीकर उपायुक्त अनुक्रमांक ७ नंतर अ.क्र. ८ व ९ चा समावेश करण्यात येत आहे.**

| अ.क्र | पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| ८ | राज्यकर उपायुक्त व्यवसायकर-१,मुंबई | MUM-PTO-E-001 | राज्यकर उपायुक्त व्यवसायकर-२,मुंबई यांच्या अधिनस्त सहायक राज्यकर आयुक्त व व्यवसायकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश तसेच या अधिकाऱ्यां व्यतिरिक्त इतर विभागातील अधिकाऱ्यांनी पारित केलेली व अन्वेषण शाखेतील अधिकाऱ्यांनी व्यवसायकराशी संबंधित प्रकरणांन मध्ये पारित केलेले आदेश |
| ९ | राज्यकर उपायुक्त व्यवसायकर-२,मुंबई | MUM-PTO-E-002 | राज्यकर उपायुक्त व्यवसायकर-१,मुंबई यांच्या अधिनस्त सहाय्यक राज्यकर आयुक्त व व्यवसायकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश तसेच या अधिकाऱ्यां व्यतिरिक्त इतर विभागातील अधिकाऱ्यांनी पारित केलेली व अन्वेषण शाखेतील अधिकाऱ्यांनी व्यवसायकराशी संबंधित प्रकरणांन मध्ये पारित केलेले आदेश |

उपरोक्त बदल हे सदर आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. उपरोक्त बदल केल्यामुळे राज्यकर उपआयुक्त अपिले-४ यांनी त्यांच्या कार्यभारातील व्यवसायकर कायद्याखालील प्रकरणे वरील क्र. ८ व ९ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे त्वरित स्थानांतरीत करावीत.

(राजीव कुमार मितल)
भा.प्र.से.
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:
१. विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.
२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई.
३ सर्व अपर राज्यकर आयुक्त
४. सर्व राज्यकर सहआयुक्त
५. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी
६. सर्व कार्यासन अधिकारी, आयुक्तांचे कार्यालय.
७. निवडनस्ती
८. स्थळ प्रत.